अधिसूचना

क्रमांक : ७१/२०२० दिनांक : २३.९.२०२०

विषय :- नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालये सुरु करण्यास शासन पत्रात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल विद्या परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत स्विकृत केल्यानुसार स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच,शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे व तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

तक्ता

अ.क्र.	संस्थेचे नांव व पत्ता	महाविद्यालयाचे नांव, ठिकाण व सांकेतिक क्रमांक	विद्याशाखा/ अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता	संलग्निकरणाचा कालावधी	शासन आदेश क्र. व दिनांक
१.	२.	३.	४.	५.	६.	७.
१.	माऊली ज्ञानेश्वर ग्राम विकास बहुउद्देशिय प्रतिष्ठाण, **जवळा,** ता.आर्णी, जि. यवतमाळ.	स्व. भारतसिंह ठाकुर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, **जवळा,** ता. आर्णी, जि.यवतमाळ. (९११)	बी.ए.भाग १ (इंग्रजी, मराठी, हिंदी, इंग्रजी साहित्य, मराठी साहित्य, हिंदी साहित्य, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, लोकप्रशासन) बी.कॉम.भाग १ (इंग्रजी माध्यम व मराठी माध्यम) अभ्यासक्रमाप्रमाणे बी.एस्सी. भाग १ (मराठी, इंग्रजी, हिंदी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, संगणकशास्त्र,परमाणुशास्त्र ,सुक्ष्मजीवशास्त्र)	१२० १२० १२०	सत्र २०२०-२१ करिता	शासन आदेश क्र. एनजीसी २०२०/(१०१/२०)/ मशि-४, दि.३१ जुलै २०२०
२.	तुळजादेवी जनकल्याण बहुउद्देशिय संस्था, कोराडी, नागपुर.	शानुबाई नाईक महीला महाविद्यालय, **ढाणकी,** ता.उमरखेड, जि.यवतमाळ. (९१२)	बी.ए.भाग १ (इंग्रजी, मराठी, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र,मराठी साहित्य, संस्कृत साहित्य) बी.कॉम.भाग १ अभ्यासक्रमाप्रमाणे बी.एस्सी. भाग १ (मराठी, इंग्रजी, गणित, भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र)	१२० १२० १२०	सत्र २०२०-२१ करिता	शासन आदेश क्र. एनजीसी २०२०/(१०१/२०)/ मशि-४, दि.३१ जुलै २०२०

३.	श्रीधर पाचघरे गुरुजी ज्ञानप्रबोधिनी, **पथ्रोट,**ज्ञानेश्वरी मेन रोड,पथ्रोट, ता.अचलपुर, जि.अमरावती.	डॉ.एस.एस. गोरडे विज्ञान महाविद्यालय, **पथ्रोट,** ता.अचलपुर, जि.अमरावती. (८५३)	बी.एस्सी. भाग १ (मराठी, इंग्रजी, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, जैवतंत्रज्ञान, सुक्ष्मजीवशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, संगणकशास्त्र,परमाणुशास्त्र , पर्यावरणशास्त्र)	१२०	सत्र २०२०-२१ करिता	शासन आदेश क्र. एनजीसी २०२०/(१०१/२०)/ मशि-४, दि.३१ जुलै २०२०
४.	बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी, बुलडाणा.	श्रीमती बसंतीबाई देवकिसनजी चांडक सहकार कला व वाणिज्य महाविद्यालय, **डोंगर खंडाळा,** ता.जि.बुलडाणा. (१००३)	बी.ए.भाग १ (इंग्रजी, मराठी, मराठी साहित्य, इंग्रजी साहित्य, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र) बी.कॉम.भाग १ अभ्यासक्रमाप्रमाणे	१२० १२०	सत्र २०२०-२१ करिता	शासन आदेश क्र.एनजीसी२०२०/ (१०१/२०)/ मशि-४, दि.३१ जुलै २०२०,
५.	जिजामाता शिक्षण संस्था, **जालना,**	रामकृष्ण वायाळ पाटील महाविद्यालय, **किनगांव राजा,** ता.सिंदखेड राजा, जि.बुलडाणा (१००४)	बी.एस्सी. भाग १ (इंग्रजी, मराठी, हिंदी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, परमाणुशास्त्र संगणकशास्त्र) बी.कॉम.भाग १ (अभ्यासक्रमाप्रमाणे) बी.ए.भाग १ (इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मराठी साहित्य मानसशास्त्र, भूगोल, लोकप्रशासन)	१२० १२० १२०	सत्र २०२०-२१ करिता	शासन आदेश क्र. एनजीसी २०२०/(१०१/२०)/ मशि-४, दि.३१ जुलै २०२०
६.	दि. नांदुरा इंग्लिश एज्युकेशन सोसायटी, **नांदुरा,** ता.नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा.	श्रीमती एम.पी. कोठारी महिला महाविद्यालय, **नांदुरा,** ता.नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा. (१००५)	बी.ए.भाग १ (इंग्रजी, मराठी, मराठी साहित्य, इंग्रजी साहित्य, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र गृहअर्थशास्त्र) बी.कॉम.भाग १ (इंग्रजी माध्यम व मराठी माध्यम) (अभ्यासक्रमाप्रमाणे) बी.एस्सी. भाग १ (मराठी, इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र)	१२० १२० १२०	सत्र २०२०-२१ करिता	शासन आदेश क्र. एनजीसी २०२०/(०१/२०)/ मशि-४, दि.३१ जुलै २०२०

७.	उत्कर्ष फाऊंडेशन मु.पो. राहेरी बु. **<u>सिंदखेड राजा,</u>** ता.सिंदखेड राजा, जि.बुलडाणा.	उत्कर्ष कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, **<u>सिंदखेड राजा,</u>** ता.सिंदखेड राजा, जि.बुलडाणा. (१००६)	बी.ए.भाग १ (इंग्रजी, मराठी, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र) बी.कॉम.भाग १ (अभ्यासक्रमाप्रमाणे) बी.एस्सी. भाग १ (मराठी, इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, संगणकशास्त्र वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, परमाणुशास्त्र)	१२० १२० १२०	सत्र २०२०-२१ करिता	शासन आदेश क्र. एनजीसी २०२०/(१०१/२०)/ मशि-४, दि.३१ जुलै २०२०

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****